# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

**नवीन प्रशासकीय इमारत, ४था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१**

**दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०५८०/२६०५०६३२/३३ E-Mail :- sic.pune10@gmail.com**

**Website: www.sic.maharashtra.gov.in**


---

क्रमांक :- सेनिसे-२०२४/प्र.क्र.२९/आस्था
दिनांक :- ०९.१२.२०२४

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विषय :- राज्य शासनाच्या अधिपत्याखालील प्रशासकीय विभाग / क्षेत्रीय कार्यालयातून गट-ब ( राजपत्रित/ अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पद्धतीने नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने जाहीरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत.

महोदय,

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ कार्यालयातील लेखा, प्रशासकीय विषयक संदर्भातील विवक्षित कामासाठी राज्य शासनाच्या प्रशासकीय विभाग/ क्षेत्रीय कार्यालयातून गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ कार्यालयामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर २०१६ व दि. ०८/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करार पद्धतीने नियुक्ती करावयाची असून त्याकरिता प्रसिद्ध करावयाची जाहिरात व अर्जाचा विहित नमुना सोबत जोडला आहे. तरी सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व मंत्रालय इंट्रानेटवर तातडीने प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

(गीता कुळवंत)
प्र. उपसचिव
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**गट-ब ( राजपत्रित / अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा करार तत्वावर घेण्यासाठी अर्ज मागविणेबाबत जाहिरात**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ कार्यालयामध्ये सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय, संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या गट ब (राजपत्रित/अराजपत्रित) यांचेकडून खालील पदा करीता अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र | पदनाम | पात्रता | पद संख्या | अर्ज सादर करावयाचा शेवटचा दिनांक | मुलाखतीचा संभाव्य दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहायक प्रशासन व लेखा अधिकारी करार तत्वावर | राज्य शासनाच्या विविध विभागांमधून गट ब (राजपत्रित/अराजपत्रित) अधिकारी. | ०१ | २०/१२/२०२४ | ३०/१२/२०२४ |

अर्जदाराने त्यांचे अर्ज उपसचिव, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, विधान भवन समोर, पुणे ४११ ००१ यांचेकडे वरील नमूद दिनांका पर्यंत सादर करावेत. अधिक माहिती व विहीत नमुन्यातील अर्ज www.maharashtra.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर सविस्तरपणे उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**या पदांबाबत व त्यांच्या अटी व शर्ती बाबत काही बदल/सुधारणा त्याच प्रमाणे तारखांमध्ये बदल असल्यास www.maharashtra.gov.in या महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी पुन:श्च वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केली जाणार नाही.**

स्वाक्षरीत/-
(गीता कुळवंत)
प्र. उपसचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

## अर्जाचा नमुना

| | | | | |
|---|---|---|---|---|
| राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागातून/क्षेत्रीय कार्यालयातून गट-ब ( राजपत्रित / अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी आस्थापना व लेखा विषयक कामकाजासाठी करार पद्धतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज. | | | | पासपोर्ट साईज फोटो |
| १ | संपूर्ण नाव | | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | | | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक | | | |
| ४ | ईमेल आयडी | | | |
| ५ | जन्मतारीख | | | |
| ६ | सेवानिवृत्तीचा दिनांक | | | |
| ७ | अर्ज सादर करते वेळे वय | | | |
| ८ | शैक्षणिक अर्हता | | | |
| ९ | सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | | | |
| १० | सेवानिवृत्त झालेल्या पदाचे नाव | | | |
| ११ | सेवानिवृत्तीच्या दिवशी अंतिम वेतन | | | |
| १२ | सध्या मिळणारे निवृत्ती वेतन (मंजूर झाल्याप्रमाणे ७ वा वेतन आयोगानुसार) | | | |
| १३ | एकूण शासकीय सेवेचा कालावधी | | | |
| | अ. क्र. | कार्यालयाचे नाव | काम केलेल्या पदाचे नाव | कालावधी |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १४ | सोपविण्यात येणा-या कामाबाबतचा अनुभव आहे का? असल्यास त्याबाबतचा तपशील | |
| १५ | शासकीय सेवेत असताना कधी विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही झाली का? | |
| १६ | सेवानिवृत्त झालेल्या कार्यालयाकडून अंतिम विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही चालू आहे काय? याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे का? | |
| १७ | सेवानिवृत्त वेतनाचा प्रदान आदेशाची प्रत (PPO) जोडली आहे का? | |
| १८ | संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान आहे का? असल्यास तपशिल | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य/चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे.

कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणा अधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशिलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे.

टिप:- अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे

( )

**अर्जदाराचे नाव व स्वाक्षरी**

सोबत कागदपत्र :

१) कार्यालय प्रमुखाचा सेवानिवृत्ती आदेश.
२) विभागीय चौकशी चालू किंवा प्रस्तावित नसले बाबतचे प्रमाणपत्र
३) संगणक हाताळणी बाबतचे ज्ञान असलेबाबतचे MS-CIT उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा अन्य पुरावा.